REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 4 | JANUARY - 2021

पारंपरिक रांगोळी लोककला

प्रा. डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभागप्रमुख, पेमराज सारडा महाविदयालय,
अहमदनगर.

प्रस्तावना :

64 कलांमधील जी एकतिसावी कला आहे त्यात रांगोळीचा उल्लेख केलेला आढळतो. रांगोळी हा एक पारंपरिक कलाप्रकार आहे. रांगोळीतील आकृतिबंध हे धार्मिक प्रतीकांचे निर्देशक आहेत. यामध्ये सरळ रेषेपेक्षा वक्ररेषेला जास्त महत्व दिले जाते. ही कला अशुभनिवारक व शुभ्रपद मानतात. सौंदर्याचा साक्षात्कार व मागल्याची सिध्दी हा रांगोळीमागील प्रमख उद्देश्य आहे. (3 रे शतक) रांगोळी ही कला वैयक्तिक स्वरुपाची असली तरी पिढ्यान पिढ्या सार्वजनिक जीवनता जोपासली असल्याने तिला लोककला हा नावलौकिक प्राप्त झला आहे.

रांगोळी ही मुख्यतः दरवाजाच्या, माजघरातल्या, देवघराच्या उंबरठ्यावर अशी विविध उंबरठ्यांवर काढण्याची पध्दत रुढ आहे. याशिवाय साधारण दारपुढेच घराचे अंगण, देवघर, देवालये, तुळशी वृंदावनसारखी पवित्र स्थाने तसेच पाटाभोवती, ताटाभोवती इ. ठिकाणी काढली जाते. तसेच भोजन समारंभ, धार्मिक विधी, सण समारंभ व मंगलप्रसंगीही रांगोळी काढण्याची प्रथा आहे.

1) रांगोळीच्या व्याख्या –

अ) विशिष्ट शुभ्र, चुर्ण चिमटीतून जमिनीवर सोडून रेखाटलेल्या आकृतीला रांगोळी असे म्हणतात[1]. (भारतीय संस्कृतीकोश–6 वा खंड, मराठी भाषा ते साहित्य व राजस्थान (1) संपा.तर्कतीथ लक्ष्मणशास्त्री जोशी, सहसंपा. तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, 410, शनिवार पेठ, पुणे 30, पृ. 749)

आ) पांढरी भुकटी किंवा पुढ यांचा उपयोग करुन जमिनीवर हाताने काढलेला आकृतिबंध म्हणजे रांगोळी होय[2]. (विश्वकोश–14 वा खंड (यंग, यंगवर्ड ते रेयन्सो बेट), प्रमुख संपा, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, पृ137)

इ) रांगोळी म्हणजे हिंदू संस्कृतीचा कलात्मक आदर्श होय. रांगवळी, रंगमाळी, रंगमाळा, रंगावली, रांगोळी अशा नावाने ती ओळखली जाते[3]. (आपले सण, आपले उत्सव– दा. कृ.सोमण, कन्सेप्ट मिडिया सर्व्हिसेस प्रा. लि. चा उपक्रम) पहिला मजला, परचुरे प्रसाद, १०६०, शुक्रवार पेठ, पुणे –2, 137)

ई) (I) रज्ज म्हणजे रंगविणे, मुळ संस्कृत धातुपासून रंगवल्ली रंग + आवली म्हणजे ओळी असे शब्द तयार झाले.

(II) रांगोळी म्हणजे रंगांची ओळ, रंगाची मेघ यांनी काढलेले चित्र व ते चित्र म्हणजेच मूर्तिमंत श्रध्देचे प्रतीक. पावित्र्याचे शालिनतेचे प्रतिबिंबच! घरादाराचे मांगल्य, पिढीजात सौंदर्य, कल्पकतेचा एक अभिनव प्रकार, हिंदू

संस्कृतिचा कलात्मक आदर्श व स्त्री जीवनाचे एक आगळे–वेगळे वैशिष्टय होय[4]. (रांगोळीः कला आणि आविष्कार –सौ. जयश्री मकुंद जोशी, यशंवत प्रकाशन, 753 सदाशिव पेठ, पुणे शेअर मार्केट शेजारी पुणे –414030 पृ.8)

2) वेगवेगळया राज्यांतील रांगोळी –

सण उत्सव, मंगलसमारंभ पूजा, कुलाचार ,कुलधर्म, संस्कारविधी, व्रतवैकल्ये यांच्याशी सामान्यपणे ही कला निगडित आहे. राजस्थानात ती ''माडण'' सौराष्ट्रात ''सथ्था'' मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात ''चौकपूरना'' किंवा अयपन, अथवा अलिप्ना'' बंगालमध्ये अलिप्ना किवा अल्पना अथवा ओसा गुजरातमध्ये साथिया कर्नाटकात रंगोली व महाराष्ट्रात रांगोळी या नावाने ती ओळखली जाते[5]. (विश्वकोष खंड 14वा, आपले सण, आपले उत्सव.)

3) रांगोळीचा इतिहास / पुराणातील संदर्भ –

अ) प्रभु श्रीरामचंद्र चौदा वर्षाचा वनवास संपवून अयोध्येला परत येणार, हे कळताच नागरिकांनी गुढ्या, तोरणे आणि फुलांच्या माळांनी संपूर्ण अयोध्याच सजवायची असे ठरविले. स्त्रियांनीसुध्दा रस्त्यांवर दुतर्फा वेलबुट्टी काढायचे ठरविले. पुढे समृध्दीचा –हास होऊ लागताच, स्वस्तिक, शंख, चक्र, गदा, गोपद्म इ. शुभचिन्हांचा उपयोग आसुरी प्रवृत्तींचा नाश होऊन सत्प्रवृत्ती व शुभ घटना निर्माण करण्याची इच्छा रांगोळीद्वारे अभिव्यक्त होऊ लागली.

आ) महाभारतातसुध्दा मयसभेत पाण्यावरील रांगोळीचा उल्लेख आढळतो. त्या रांगोळीला गालीचा समजून दुर्योधन तयावरुन चालायला लागला, तेव्हा तो पाण्यात पडला व त्याचे हसे झाले.

इ) सौंदर्याचा साक्षात्कार व मांगल्याची सिध्दी हा या रांगोळी मागील प्रमुख उद्देश आहे. असा वात्सायनाच्या कामसुत्रात उल्लेख आढळतो. (३ रे शतक)

ई) तिस–या शतकात सरस्वतीच्या मंदिरात, शिवलिंगाच्या पूजेसाठी विविधरंगी फुलांनी रांगोळी काढली जात असे. तसेच विविध धान्यांचा वापर करुनही रांगोळी काढली जात असे. तसेच विविध धान्यांचा वापर करुनही रांगोळी काढली जात असे.

उ) इ.स.च्या ७ व्या शतकात वरांगचरिता मध्ये पंचरंगी चुर्णे, धान्ये, फुले इ. साहित्यांनी चित्रविचित्र आकृतिबंध म्हणजेच रांगोळी काढली जायची.

ऊ) इ.स.च्या १० व्या शतकात वादिभसिंहाच्या ''गद्यचिंतामणी'' या ग्रंथात भोजन समारंभात मंगलचुर्ण रेखा काढीत असत, असा रांगोळीचा उल्लेख आहे.

ऋ) इ.स.च्या अकराव्या व बाराव्या शतकात हेमचंद्राने देशी नाम माला ह्या ग्रथांत तांदुळाच्या पिढीने रांगोळी काढल्याचे सांगितले आहे.

ए) सोमेश्वराने ''धुलिचित्र'' या नावाने व श्रीकुमार याने शिल्परत्नात क्षणिकचित्र या नावाने रांगोळीचा निर्देश केला आहे. (रांगोळी–कला आणि आविष्कार – सौ जयश्री मुकुंद जोशी, पृ.७)

वरील सर्व संदर्भ पाहिले असता ही कला दोन हजार वर्षापासून प्रचलित असल्याचे आढळून येते[6] (विश्वकोश, खंड १४ वा, पृ. ६४८) तसेच रांगोळी ही मूर्तिकला व चित्रकला यांच्या आधीची आहे, असेही म्हणता येईल[7].

(भारतीय संस्कृतीकोश– ७ वा खंड ७४६)

४)रांगोळीचे आकार

कोणत्याही प्रकारची रांगोळी घेतली तरी ती मुख्यतः सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्र, स्वस्तिक, कमळ, गोल, त्रिकोण, चौकोन, षट्कोन, अष्टकोन इ. भौमितिक आकार, विविध लयदार रेषा, निसर्गातील फुले, वेली, पाने, पशू, पक्षी व मानवनिर्मित वस्तू, धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक प्रतीके व प्रसंग यापैकी कोणत्याही आकारांवर आधारित असते. वरीलपैकी काही आकार निवडून तयांची सुसंघटित रचना करुन आपण आपले स्वतःचे डिझाईन करु शकतो.

५)रांगोळीतील चिन्हे –

रांगोळीतील चिन्हांना महत्वाचे स्थान असून, भारतामध्ये वेगवेगळ्या चिन्हांचा वापर करुन रांगोळी सजविली जाते.

१) बिंदू – यात बीजाचे रहस्य आहे.

२) सरळ रेषा– हे सरळ स्वभावाचे संशोधन वृत्तीचे, स्नेह जोडण्याचे प्रतीक आहे.
३) अर्धवर्तुळ– हे धारणाशक्तीचे प्रतीक मानले जाते.
४) वर्तुळ– हे पुर्णत्वाचे प्रतीक मानले जाते.
५) गोपद्म– हे लक्ष्मीच्या पावलांचे प्रतीक आहे.
६) सर्परेषा – हे वायू, जल, लाटा, भरती, सुसंस्कृतता, प्रगती यांचे प्रतीक आहे.
७) कोयरी– हे सौभाग्याचे प्रतीक आहे.
8) स्वस्तिक – हे गतिशीलतेचे प्रतीक आहे. स्वस्तिक म्हणजे सौंदर्य, सुसंवाद, उल्हास, प्रेम, शुभकामना, शक्ती होय.
9) ॐ सृष्टीनिर्मितीच्या वेळचा हा ध्वनी विश्वरुपाचा साक्षात्कार– अ म्हणजे पृथ्वी, म्हणजे अंतरिक्ष, म म्हणजे द्यूलोक, अकार उत्पत्ती, उकार स्थिती आणि मकार विलय दर्शवितो.
१०) केद्रवर्धिनी – विश्वाच्या अनंततेचे ते प्रतीक आहे.
११) तुरा– हे स्वाभिमानाचे, सन्मानाचे प्रतीक आहे.
१२) श्री – हे शुभारंभाचे प्रतीक आहे.
१३) सरस्वती– हे विद्येच्या देवतेचे प्रतीक आहे. सरस्वती म्हणजे वाणी होय.
१४) कलश – हे देवतांच्या अंशाचे प्रतीक मानले जाते.
१५) शंख – प्रणव ध्वनीच्या नादमयतेच्या प्रकटीकरणाचे प्रतीक.
१६) चक्र– हे गतिसूचक आहे. भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ या सृष्टीचक्राच्या परिवर्तनशील शक्तीचे प्रतीक आहे.
१७) गदा – हे सामर्थ्याचे प्रतीक आहे. तसेच ते सत्याचे रक्षण करणा–या शक्तीचे प्रतीक आहे.
१8) कमळ – सौंदर्य, कोमलता, प्रसन्नता, शुचिता, सर्जनशीलता, विमलता यांचे प्रतीक म्हणजे कमळ होय. कमळ हे स्त्री– तत्व आहे. कमळ म्हणजे शोभा, वैभव, आरोग्य, दीर्घायुष्य, कीर्ती, अमृत, शाश्वतजीवन, संस्कृतीचे सार, शूचित्व आणि शुध्द ज्ञान यांचे प्रतीक आहे.
१9) ध्वज – हे ध्वज हे तपाचे त्यागाचे प्रतीक आहे.
२०) धनुष्य – हे विजयप्राप्तीचे प्रतीक आहे.
२१) बाण – हे लक्ष्यासिध्दीच्या संप्रेरक शक्तीचे प्रतीक आहे.
२२) त्रिशुल – त्रिशुळाची तीन टोके म्हणजे ब्रम्हा, विष्णू, महेश यांच्यारुपाने ते शक्तीचे प्रतीक आहे। ते सर्जन, पालक आणि संहार यांचे दैवत आहे.
२३) त्रिदल– ह त्रिकाल, त्रिभुवन आणि तीन अवस्थांचे प्रतीक आहे.
२४) अष्टदल– हे अष्टदिशांचे प्रतीक आहे.
२५) श्रीफळ – हे शुभतत्व व सर्जनशक्तीचे प्रतीक आहे.
२६) शृंखला – शृंखला हे स्नेहभाव जपण्याचे, नागयुग्माचे, एकात्मतेचे, संयमाचे प्रतीक आहे.
२७) विष्णुपाद – हे ईश्वरी अधिष्ठानाचे, मार्गदर्शनाचे प्रतीक आहे.
२8) लक्ष्मीची पावले – हे सुख, समृध्दी, आरोग्य, वैभव यांचे प्रतीक आहे.
२9) दीप – हे प्रसन्नतेचे, ज्ञानाचे, तेजाचे, तृप्तोचे प्रतीक आहे.
३०) कासव – कासव हा संथगतीने विजय मिळविणारा प्राणी आहे.
३१) सुर्य – सूर्य ज्ञान, बुध्दी, तेजस्विता यांचे प्रतीका आहे.
३२) चंद्र– चंद्राची शीतलता सर्वांना भावते.
३३) चांदणे – चांदण्या आल्हाददायक असतात.
३४) नक्षत्र
३५) ज्ञानकमळ – जे ज्ञानाची उपासना करते ते ज्ञानकमळ.

६) रांगोळी काढण्यासाठीचे पदार्थ –

वेगवेगळ्या माध्यमांच्याद्वारे रांगोळी काढून तिचे सौंदर्य फुलविलेले दिसून येते.

अ) भारतात रांगोळ्यांची माध्यमेसुध्दा वेगवेगळी आहेत. बंगालमध्ये तांदूळ दळून त्याचे पीठ वापरले जाते तर महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये रांगोळीची विशिष्ट पावडर वापरली जाते. राजस्थानमध्ये रांगोळीसाठी खडी, गेरु वापरण्याची पध्दत आहे. अन्य प्रदेशांमध्ये हळद, कुंकू, गुलाल यांचाही वापर होतो. आजकाल तर पक्के रंग व आक्रईलपेंटचाही वापर होऊ लागला आहे.

आ) वेगवेगळ्या धान्यांचा कोंडा हा देखील विविध रुपात येतो। तो कोंडा जर आपण कापड अथवा जाड पुठ्ठयावर फेविकाक्रलवर चिकटविला तर समारंभासाठी अनुकूल असे चित्र/ देखावा आपण तयार करु शकतो.

इ) दगडाचे बारीक खडे, फुटलेल्या कपबश्यांचे तुकडे, चिनीमातीच्या बरण्यांचे तुकडे, बांगडयांचे तुकडे इ. जमिनीत वेलबुट्टीची आकृती किंवा तत्सम काही आकार जर आपण जमिनीत कोरुन किंवा आखूण घेतले तर त्यात वरील कोणतेही साहित्य चपखलपणे बसवून दीर्घकाळ टिकेल अशी विविध प्रकारात, विविध रंगात, रांगोळी काढून आपण घराची शोभा वाढवू शकतो.

ई) कोरंटीची फळे किंवा कडू कवठाची फळे कडू असल्यामुळे त्याचा वापर फारसा होत नाही. त्यातील आतला भाग कोरुन त्यात दिवा लावून त्याचा पणतीसारखा उपयोग ताटाभोवती ठेवण्यासाठी करता येतो.

इ) ताटाभोवतीच्या रांगोळ्या – बाजारातून साहित्य आणून वेगवेगळ्या प्रकारच्या ताटाभोवतीच्या रांगोळ्या काढू शकतो. उदा. थर्माकोल घेऊन त्याचा महिरपीसारखा आकार कापून (हल्ली थर्माकोल मशिनवर पाहिजे त्या आकारात कापून मिळतात.) त्यावर लेस, आरसे, टिकल्या इ. सजावटीचे साहित्य चिकटवून त्याची रांगोळी ताटाभोवती काढता येते.

ऊ) दोन मोर समोरासमोर बघताहेत असा आकार प्लायवूडवर कापला व नंतर मोराचा पिसारा, तोंड डोळे वगैरे रंगविले तर अशीही कायमची ताटाभोवती रांगोळी किंवा महिरप तयार होईल.

ऋ) छोटेछोटे दिवे असणारी माळेची महिरप म्हणून ताटाभोवती, अर्धगोल ठेवल्यास ताटात उजेड ही पडेल व रंगीत दिव्यांनी अनोखी शोभा येते.

ए) फेव्हिकॉलमध्ये वेगवेगळ रंगीत ऑईलपेंट घातल्यास त्या मिश्रणाने दारासमोर कायमस्वरुपी रांगोळी काढतात.

ऐ) हल्ली बाजारामध्ये चिकटपट्टीही मिळते. मोठ्या गोल रांगोळ्या, उंब–यावरच्या लांब पट्टयाच्या रांगोळया किंवा अष्टविनायक, लक्ष्मीची पावले इ. प्रकार ह्यात आहेत.

ओ) मोठे गोल असलेले रांगोळीचे चित्र हे अंगणात किंवा हल्ली सदनिकेच्या छोटया दारात चिकटवून कायमस्वरुपी रांगोळी म्हणून उपयोगात आणतात. याशिवाय अष्टविनायक असलेल्या लांब पट्टया हया देवघरावर लावतात.

याशिवाय 1)फुलांची 2) धान्यांची 3) मिठाची 4) भुश्याची 5)पाण्यावरची 6) पाण्याखालची 7)कणकेची 8) हातावरची (मेंदी) अशा विविध माध्यमांतूनही रांगोळी काढता येते.

७)७ वारांच्या ७ रांगोळया –



आठवड्याच्या वाराप्रमाणेही आपल्याकडे रांगोळी काढली जाते. उदा.

१) सोमवार – क्लीम – या रांगोळीने विघ्ने दूर होतात.
२) मंगळवार – –हीम – या रांगोळीने शत्रूचा नाश होतो.
३) बुधवार– रौंई – या रांगोळी ने सकल शास्त्रांचे ज्ञान मिळेल.
४) गुरुवार – श्रीम – या रांगोळी ने सकर संपत्तीसहित विद्याप्राप्ती होते.
५) शुक्रवार – श्रीम– या रांगोळीने विवाहयोग, सौभाग्यवर्धन, पुत्र किंवा संतानप्राप्ती होते.
६) शनिवार – सम – रोगराई बरी होते, कर्जातून मुक्ती, भुतप्रेत, दृष्ट लागणे यापासून मुक्ती मिळते.
७) रविवार – –हीम – या रांगोळीने सकल कार्यसिध्दी होते.

8) सणांच्या रांगोळ्या –

ज्याप्रमाणे आपल्याकडे आकारानुसार, वारांप्रमाणे रांगोळी काढण्याची पध्दत आहे. त्याप्रमाणेच महाराष्ट्रात सणांप्रमाणेच रांगोळी काढण्याची पध्दतही रुढ आहे.

१) चैत्रांगण – चैत्र महिन्यात सजविलेले अंगण म्हणजे चैत्रांगण. याचा कालावधी चैत्र प्रतिपदेपासून ते अक्षय तृतीयेपर्यंत असतो. या महिन्यात आंब्याच्या झाडाचे महत्त्व असल्याने चैत्रांगण काढण्याची सुरुवात आंब्याच्या तोरणापासून करतात. शुभकार्याला सुध्दा आपण आंब्याचे तोरण दाराला बांधतो.



२) गुढीपाडवा – पाडव्याला आपण गुढी उभारतो तेव्हा वेलदोड्याचा वेल काढण्याची पध्दत आहे.
३) हया महिन्यात काही ठिकाणी श्रीरामाचे नवरात्र असते म्हणजे ।। श्रीराम प्रसन्न ।। असे काढून नंतर चंद्र, सूर्य, चांदणी हे आकाशातील ग्रह काढले जातात.
४) प्राणीमात्रांबद्दलचा आदरभाव म्हणून गोपद्म काढतात. घरामध्ये लक्ष्मीची पावले हवीत म्हणून तीसुध्दा काढली जातात. मधोमध मखर काढुन त्यात जेष्ठा व कनिष्ठा गौरी काढतात. आणि त्याच्याजवळच स्त्री–तत्वाचे प्रतीक मानला जाणारा पाळणा काढला जातो. कारण पाळणा म्हणजे जन्मोत्सव होय. घरात आलेल्या नवीन बाळाला आपण पाळण्यात घालतोच. बाळ म्हणजे संतती सुखाचे चिन्ह त्याच्याखाली सौभाग्यचिन्ह काढून त्यात आरसा, करंडा, तांब्या–भांडे काढतात. त्यांच्या दोन्ही बाजूला कुंड्या व त्यात फुलझाडे असतात. त्यांची आयुधे विविध प्रकारात काढतात. उदा. शंख, चक्र, गदा, त्रिशुळ, डमरु, परशु इ. शंख म्हणजे नाद, चक्र म्हणजे परिवर्तन. दिवस

रात्रीचे 6च क्र सतत फिरत असल्यामुळे काळ पुढे जातो। याशिवाय रांगोळीमध्ये बाळ्याचे दोन पंखे, दोन पाटा, तुळशी वृंदावन, हत्ती, कासव, गरुड, सर्प, गायसुध्दा काढले जाते. वंश विस्ताराचे प्रतीक असलेल्या ह्या वेलाला मानाचे सीान ह्या रांगोळीत आहे.

५) दसरा :– आश्विन महिन्यातील दस–याला विद्येची देवता सरस्वती पाटीवर काढून लहान मुलांना तिची पूजा करायला सांगतो.

६) चतुर्थी – चतुर्थीच्या दिवशी चक्रव्यवहाची रांगोळी देवापुढे काढली जाते.

७) तुलसीविवाह – कार्तिक शुध्द एकादशी ते पौर्णिमेपर्यंत तुलसीविवाहाचा कालावधी मानला जातो.

8) लक्ष्मीपूजन – लक्ष्मीपूजनासाठी लक्ष्मीचे आसन हे आधी पाटावर किंवा चौरंगावर काढून मग ताम्हण ठेवून त्यात लक्ष्मीची मूर्ती ठेवून पूजा करावी म्हणजे ताम्हणाबाहेर त्याची टोके आली पाहिजेत. इतकी लक्ष्मीचे आसन मोठे असावे. जेणेकरुन केलेल्या पूजेवर दिशांचा प्रभाव पडून पूजा फलदायी होते.



9) देवघरापुढची रांगोळी –

देवापुढे जी रांगोळी काढली जाते, त्यामध्ये सर्व शुभचिन्हेच असतात. यातील प्रत्येक चिन्ह हे अर्थपूर्ण असते. दवापुढे रांगोळी काढताना रुंद बाजू देवघरापुढे असली पाहिजे. सर्वात प्रथम श्रीराम प्रसन्न किंवा श्री गणेश प्रसन्न किंवा श्री. जगदंबा प्रसन्न, किंवा तत्सम कुलदैवताचे नाव लिहुन नंतर ऊँ श्री स्वस्तिक, हृदयकमळ, लक्ष्मीची पावले, गणपती अखंड साखळी, अष्टल, देवीचे यंत्र, गरुड इ. प्रकारच्या समावेश करतो येतो. ही रांगोळीतील प्रतीके म्हणजेच जणू एक प्रकारची सांकेतिक भाषाच होय.

१०) भितीचित्रे –

आदिमानवापासून ह्या चित्रकलेला सुरुवात झाली. भिंतीवर चित्रे काढण्याची कला सुमारे भारतात दोन हजार वर्षापासून दिसत आहेत. मध्यप्रदेशातील बाघ व दक्षिणेतील बदामी या गुहांमध्ये भित्तीचित्रे चितारलेली दिसतात.

भित्तीचित्रे काढण्यासाठी प्रथम भूसापिंड भिंतीवर थापून त्यावर मळलेल्या मातीचा थर देऊन त्यावर पातळ डिंकाचा थर देतात. नंतर त्याच्यावर पांढ–या रंगाचा एक हात देऊन त्यावर भुस्सायुक्त लेप देऊन मोहरीचे तेल आणि मेण यांचा पातळ थर देतात. प्रत्येकवेळी पृष्ठभाग हाताने सपाट करुन घेऊन मगच चित्र चितारतात. विटांची भुकटी, माती, तेल, डिंक, मेण, काकवी, मुगाचे पीठ, हिरड्याची पूड, बेलाचा अर्क व थोडी वाळू इ. सर्व पदार्थाच उत्कृष्ट मिश्रण आणि करण्याची शास्त्रोक्त पध्दत यामुळे इतक्या वर्षानंतरसुध्दाही भित्तीचित्रे आजच्या काळातही मोहक आणि आकर्षक वाटतात.

आदिवासींची रांगोळी –



आदिवासी लोक घराच्या कुंडांना शेण आणि मातीचा गिलाबा देऊन चित्र अगदी साध्या काडीने काढतात. यामध्ये ते वर्णमंडल आणि सर्वातोभद्र मंडळाचे चित्र काढतात. पैकी वर्णमंडळ हे शैवमंडळ असून ते काढलयाने सर्व इच्छा पूर्ण होतात। तर सर्वातोभद्र मंडलामध्ये मुख्य देवता ब्रह्म व इतर परिवार देवता पंचावन्न अशा एकूण छपन्न देवतांचा समावेश असतो.

वारली कला –



वारली चित्रकला ही आदिवासी लोकांची कला आहे. हा रांगोळी प्रकार नसून तयात त्यांनी जीवन दर्शनच चितारुन ही चित्रकला सोपी केली आहे. रांगोळीप्रमाणेच ह्या चित्रकलेमध्ये सुलभीकरण दिसून येते. वनवासी भागात राहणा–या लोकांचे वनातील प्राणी, झाडे, पक्षी, फुले हेच दैवत असल्याने त्यांच्या चित्रकलेत ह्या सर्वांचा समावेश प्रामुख्याने होतो. उदा. झाडावर बागडणारी माकडे, वाघ किंवा रानमांजरी किंवा राजा, देवी–देवता, विवाह प्रसंगासारख्या सामाजिक जीवनातील महत्वाच्या बाबीही यात आढळतात. वनवासी चित्रकलेचे वैशिष्टय म्हणजे भिंती रिकाम्या न ठेवणे. त्यावर चित्रे चितारुन त्या सुशोभित करणे. मनुष्यातल्या सौंदर्यबुध्दीमुळे आणि चित्रकाराच्या उपजत गुणांमुळे तो इतर पशूपासून वेगळा आहे. हे दाखवून त्याने विविध कलांचा विकास केला आहे. आदिवासी लोकांना चित्रकलेचा खर्च फारसा परवडणारा नसल्याने ते तांदुळाचे पीठ, ताडाच्या काडी कुंच्या व शेणाने सारवलेल्या कुडाच्या भिंतीचा फलक हेच त्यांचे थोडेसे साहित्य, पण त्यातही त्यांनी निर्माण केलेली कला ही अभिजात आहे. आकाराचे भान, नीटनेटकेपण, कौशल्य यामुळेच त्यांना जे दाखवायचे ते अतिशय सजीव होऊन आपल्यासमोर उभे राहते.

रांगोळी कलेचे उपयोजन –

१) चित्रकलेत सौंदर्याकृती निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रांगाळीतील पारंपरिक आकारांचा वापर केलेला दिसतो.

२) आजकालच्या इमारतींची सजावट (इंटोरिअर डेकोरशन) मध्ये रांगोळीचे पारंपरिक आणि भौमितिक आकार कौशल्याने बसविलेले दिसतात. विशेषतः पी.ओ.पी. (प्लास्टर ऑफ पॅरिस) चा वापर करुन आकार बनविलेले असतात.

३) रांगोळी चित्रांचा वापर टेक्सस्टाईल व्यवसायात म्हणजे कापडनिर्मिती व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर केलेला दिसतो. यात पुराणाकालापासून ते अत्याधुनिक परंपरांपर्यंतचे आकार व्यावसायिक दृष्टीने, प्रादेशिक, स्तरांवर आवड लक्षात घेऊन डिझाईनचे वैविध्य उपयोजित केलेले दिसते.

४) विवाह समारंभापासून अनेक मंगलमय व उत्साहवर्धक समारंभाच्याप्रसंगी विशेषतः स्त्रिया पारंपरिक रांगोळी चित्रांचा उपयोग मेहंदी रेखाटनामध्ये करतात दिसतात. पावित्र्याबरोबरच सुशोभितीकरण यासाठीही हा वापर केलेला असतो.

५) मेहंदीप्रमाणे अलीकडे प्रचलित झालेले ट्यैटयु नामक रासायनिक पदार्थापासून रेखीत केलेले गोंदणासारखे आकार सर्वांगावर सुशोभितीकरणासाठी म्हणून वापरलेली दिसतात. यात कसरतीतील स्त्रिया, खेळाडू स्पर्धक, बारबाला, कॅब्रे डान्सर यांच्यामध्ये हे आकार विशेषत्वाने पाहावयास मिळतात.

अशाप्रकारचे उपयोजन अलीकडील काळात फर्निचर, कार डिझायनिंग, ऐरोप्लेन डिझायनिंग आदि सर्व ठिकाणी उपयोजित होऊ लागले आहे.

रांगोळी लोककलेचा सनातन प्रवास –

लोककला समूहमनातील सौंदर्यदृष्टीने टिपलेले निसर्ग आणि मानवी व्यवहारातील आकार घेऊन प्रगट होत असतात. परंपरांना वर्तमानातील समूहमनाच्या आवडीनिवडींचे नव्हे तपशीलात्मक आकार देत, त्यात बदलते संदर्भ आणि बदलती रुपे घेऊन वर्तमानात प्रकट होत असतात. रांगोळी कलायास अपवाद नाही. समूहमनाची मांगल्याची आणि सौंदर्यांची भावना हा त्यातील चिरंतन लोकबंध असतो. तपशीलात बदल झाले तरीदेखील समूहमनाला या लोकबंधाने प्रदर्शित करण्याचे काम सतत होतच राहते. म्हणूनच रांगोळी कला ही या लोकमानसाच्या परंपरेतील सौंदर्यरेखेची भावना आहे, असे म्हणता येते.